BDC LIBRARY
New Paper Clipping
*A.Y. 2024-2025*

# बाळासाहेब देसाई महाविद्यालयात जिल्हास्तरीय पर्यावरणविषयक स्पर्धा

पाटण, दि. १४ : कोयना एज्युकेशन सोसायटी, पाटणच्यावतीने कोयना पर्यावरण जागृती मोहिमे अंतर्गत पर्यावरण संवेदनशील पिढी निर्माण करण्याच्या हेतूने बाळासाहेब देसाई महाविद्यालयाच्या प्रांगणात शनिवार, दि. २८ डिसेंबर २०२४ रोजी जिल्हास्तरीय विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती कोयना एज्युकेशन सोसायटीचे जनरल सेक्रेटरी अमरसिंह पाटणकर यांनी दिली.

या स्पर्धांमध्ये लहान गट इयत्ता ५ वी ते ७ वी, मध्यम गट इयत्ता ८ वी ते १० वी, मोठा गट इयत्ता ११ वी ते १२ वी असे गट तयार करण्यात आले आहेत. वरील सर्व गटांमध्ये निबंध लेखन, चित्रकला स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, प्रश्न मंजूषा स्पर्धा, निसर्ग ओळख स्पर्धा अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे.

स्पर्धेतील प्रथम तीन विजेत्यांना रोख रक्कम व प्रशस्तिपत्रक देवून गौरविण्यात येणार आहे. स्पर्धेत सहभागी होणाऱ्या स्पर्धकांना २० रुपये शुल्क आकारले जाईल. दि. २७ डिसेंबर २०२४ पूर्वी प्रा. आर. के. शिर्के, मोबा. ८४८२९२०२१६, प्रा. के. आर. पवार, मोबा. ९७६७०५८८४४ , प्रा. एस. के. संकपाळ, मोबा. ९८८१८१ ३१४६ व प्रा. व्ही. आर. शिर्के , मोबा. ९६२३३६३७११ यांच्याकडे स्पर्धकांनी नाव नोंदणी करावी. या स्पर्धेत सातारा जिल्ह्यातील जास्तीत जास्त शाळा, महाविद्यालयांनी सहभागी व्हावे, असे आवाहन कोयना एज्युकेशन सोसायटीचे संचालक याज्ञसेन पाटणकर व संजीव चव्हाण यांनी केले आहे.